उपाशी महाराष्ट्राला उद

भाग १ ला.



कापसाचा रोजगार व विणकामाचा धंदा एतत्संबंधीं विवेचन.

[धनुर्धारीनें लिहिलें.]

प्रकाशकः— ल. वें. मांजरेकर आणि कंपनी.
मोतीबाजार, कालिकादेवी पोष्ट, मुंबई.
धी "इंग्लिश आणि गुजराथी" जॉब छा० छापिलें.

किंमत ०≡, शिवाय टपाल खर्च ०॥. आणा.

☞ भाग दुसरा छापत आहे.

१९०३.

प्रस्तावना.

—:ऌ:—

उद्योग कोणता करावा ही पंचाईत आणि वि
सध्यां आपल्या महाराष्ट्रांत सर्वत्र आणि जास्त आढ
आपल्या देशबंधू पुढें विचार करण्यासाठीं ही चार
सादर केलीं आहेत. पुष्कळ दिवसां पूर्वी केसरींत प्र
झालेलें याच लेखकाचें दोन निबंध येथें उतरून घेतले
कापसाचा रोजगार हा विषय ही मुंबईच्या उद्यमोत
साठीं लिहून प्रसिद्ध केलेला येथें घेतला आहे.ही पानें व
पहावी. प्रयोग करून स्वतः अनुभव मिळविण्याचे प्र
हवेत. एकदम प्रारंभ करूंनये. स्वानुभवानें दृष्टीस स्पष्ट
सल्या नंतर खरें खोटें आपोआप ठरणार आहे. या
जास्त येथें लिहिणें नको. व्यवस्थित प्रारंभ; लहान, अ
लहान प्रमाणांवर अनुभवाची सुरुवात आणि अनु
ठरल्या शिवाय कोणतेंच खरें नाहीं असे मानणें, या
गोष्टी प्रत्येक वाचकानें नीट ध्यानांत ठेवाव्या, हें एक
गणें मुख्य आहे.

श्रीगणेश चतुर्थी. धनुर्धारी

शके १८२५.

उपाशी महाराष्ट्राला उद्योग.

सद्यःस्थिति.

आमच्या महा-राष्ट्र समाजांतल्या सद्यःस्थितीचें, अगदीं सूक्ष्म रीतीचेंच केवळ नको, अति ढोबळ व वरवर पाहण्यासारखें, अवलोकन करण्याचा प्रयत्न केला तरी खालील स्थिति आढळून आल्याशिवाय रहात नाहीं.

१ घरोघर विवंचना अगदीं एक. **काय करावें ? उत्पन्नावर खर्च भागत नाहीं.** जमाखर्चाची तोंडमिळवणी शक्य होईना. **खर्च** वाढता, **उत्पन्न** कमी, खर्चाचीं तोंडें अधिक मोठीं वाढतीं; उत्पन्नाच्या बाबी लहान, कमी व अकुंचित; काय करावें? उत्पन्न कसें वाढेल ?

२ कर्जाची कडकडून भेट, उसनवारीची नित्य गरज, उधारी शिवाय पाय पुढें पडत नाहीं.

३ दारिद्र्य वाढतें, गरजा फाजील, हव्यास मोठा, राहणी मिजासी, वागणें दिखाऊ.

४ आतां माझें कसें तरी झालें—**माझ्या मुलाबाळांची सोय काय करावी?** त्यांना **धंदा कोणता ?** त्यांना **भाकरी कशी मिळेल ?** ही विवंचना सारखी पाठीस लागलेली!

५ दुखणाईत बायको, रें-रें-करणारीं मुलें, यांची समृद्धी.

६ कोणी सहाय्य करणार नाहीं, वशीला असणारा कोण आहे? मित्र नाहीं, पोशिंदा नाहीं, सारथी नाहीं. अशी परिस्थिति महाराष्ट्रांतील शेंकडा जवळ जवळ नव्वद घरीं आढळते; आणि आढळावी यांत नवलही कांहीं नाहीं. कारण, स्वतःची नालायकी, अवश्यक प्रयत्नांचा अभाव, आळसाचा प्रताप, अज्ञानाचा महिमा, आप्तांचा तखलुबीपणा, इत्यादिकांची समृद्धि फार आहे. त्यामुळें ही अशी त्यांची स्थिति असेल तर त्यांत नवल तें कोणतें? या व असल्या सर्व परिस्थितींचें कारण **दारिद्र्य** होय. पारतंत्र्यही एक कारण मुख्य आहे, पण **दारिद्र्य** हें खरें. त्याला **उपासमार** असें ह्मणण्याला कांहीं प्रत्यवाय नाहीं. अशा आमच्या **उपाशी** महाराष्ट्राला कांहीं **उद्योग** दाखवावा, सांगावा आणि शक्य असल्यास लावूनही दिला पाहिजे. **ज्ञान** आणि **उद्योग** हे, सध्यांच्या काळीं असेंच केवळ नव्हे, तर सर्वदा, **कल्पवृक्ष** होत. परवशतेला **ज्ञान** आणि **दारिद्र्याला** उद्योग अमृत संजीवनी होय.

हेतु

सध्यांच्या आमच्या **उपाशी** महाराष्ट्राला **उद्योग कोणकोणते** शक्य व साध्य आहेत यांची प्रारंभीं मिळणें शक्य तेवढी माहिती सादर

करावी हा मुख्य हेतु आहे. **विद्वत्तेचे व्यवसाय** किंवा **सरकारसेवा** या व्यतिरिक्त धंदे कोणते हें सांगण्याचा स्पष्ट हेतु आहे. स्वतःची करामत दाखवायाला पुढें **पटांगण** केवढें हें सांगणें, प्रथमचा प्रयत्न;तदनंतर, त्या पटांगणांत करामत दाखवावयाला कशी तयारी हवी, हा विचार दुसरा; ह्मणून,प्रारंभीं **उद्योग** करण्या सारखीं कामें कोणतीं व केवढीं आहेत याचें विवेचन करावयाचें हाच एक व मुख्य हेतु सध्यां आहे. इतर हेतूंची वाच्यता योग्य प्रसंगीं होईल.

योजना. **महा**–राष्ट्रांत व **महा**–राष्ट्रीय मंडळीला करावयाचीं, करितां येतील, केलीं पाहिजेत, करणें साध्य होय, असलीं कामें, ते उद्योग, तसले धंदे, अर्थात लेखनद्वारा, दाखवावेत ही मुख्य योजना. तीं वर्तमानपत्रें व पुस्तकें याद्वारानें साधावयाचा प्रयत्न करावा ही पहिली योजना आहे. शंका, समाधान, खुलासा वगैरे प्रकारचीं समक्ष व डाकद्वारा कामें करावयाची ही योजना दुसरी पायरी होय. पण तिचा विचार अवश्यक असला तरी सध्यांच शक्य दिसत नाहीं.

एकमोठा उद्योग. कापसाचा व्यापार हा उद्योग मोठा दांडगा आहे. महाराष्ट्र देशांत कापूस भारी पिकतो. महाराष्ट्र देशांतल्या कापसाचा व्यापार फार किमतीचा

आहे. परंतु तो सर्व **व्यापार** महाराष्ट्रीय नव्हेत अशांच्या हातीं फार व मुख्य असा आहे. **शेतकरी** व **मजूर** एवढेंच काम या व्यापारांतलें महाराष्ट्रीय मंडळीच्या हातीं आहे. शेतांत कापूस पिकविणें,पिकविला त्याची खरेदी विक्री,कापसाचें कापड बनविणें व बनविलेले पदार्थ विकणें हीं सर्व या व्यापारांतलीं कामें होत. कापसाचा व्यापार गुजराथी, मारवाडी यांच्या हातीं. कापसाच्या गिरण्या महाराष्ट्रीय नव्हेत अशांच्या मालकीच्या. वठणें, गठ्ठे बांधणें हे कापूस कारखानें महाराष्ट्रीयांचे नाहींत. कापडाची व सुताची खरेदी विक्रीही महा–राष्ट्रियांची नाहीं. फक्त **शेतांतील राब, गिरण्यांतील मजुरी, बाजारांतील हमाली** आणि मग कापडाच्या खपाचीं गिऱ्हाईकीं, एवढींच कामें महाराष्ट्र या कापसाच्या व्यापारांत करीत आहे. ह्मणजे, या कापसाच्या व्यापारांतला **लोणी** खाण्याचा **मान** व हक्क महाराष्ट्रियानें दुसऱ्याच्या स्वाधीन केला आहे. **काबाड कष्टाची सत्ता मात्र** सध्यां महाराष्ट्राच्या हातीं आणि या व्यापारांतली आहे. यास्तव, प्रथमतः हा कापसाचा व्यापार केवढा व्यापक आहे आणि किती माल व्यापाराचा खेळतो याची चांगली माहिती खात्री पटे इतकी देणें हें पहिलें काम आहे, आणि, तदनंतर, कापसाच्या व्यापारांत महा–राष्ट्रियांना कसें शिरणें शक्य आहे हा विचार दुसरा. अशातऱ्हेनें या प्रश्नाचा विचार कर्तव्य वाटतो.

महाराष्ट्रांत कापसाची पैदास.

महा–राष्ट्रांत कापूस साल दरसाल किती **पैदा** होतो हें ठाम कळण्यासाठीं अनेक आंकडे व अंकानु-

मानाचे तक्ते देणें भाग आहे. त्या तक्त्या शिवाय मोघम सांगणें इष्ट नव्हे. सर्व मुंबई इलाख्यांत (देशी संस्थानें धरून)एकंदर कापसाच्या लागवडी खालीं जमीन किती एकर होती व अंदाज किती गठे कापूस पिकला ही माहिती खालील तक्त्यांत दिली आहे.

साल	कापसासाठी लागवड जमीन.			पैदास कापूस गठे.		
इ. स.	लक्ष	हजार	एकर.	लक्ष	हजार	गठे.
१-१८९१-९२	५१	३६	,,	६	८३	,,
२-१८९२.९३	५२	८६	,,	९	४६	,,
३-१८९३-९४	५९	१०	,,	९	२७	,,
४-१८९४-९५	५२	९२	,,	७	८२	,,
५-१८९५-९६	५३	३	,,	९	१५	,,
६-१८९६-९७	५०	३५	,,	७	२३	,,
७-१८९७-९८	४७	५१	,,	८	३४	,,
८-१८९८-९९	५०	९८	,,	११	१	,,
९-१८९९-००	३०	९५	,,	०	७८	,,
१०-१९००-०१	४२	४०	,,	६	७२	,,
११-१९०१-०२	३८	१९	,,	४	४३	,,

एक गठा ४०० रतल.

ह्मणजे, वरील तक्त्या मध्यें एकंदर मुंबई इलाख्यांत, देशी संस्थानें सुद्धां मिळून,एकंदर अकरा वर्षांची सरासरा पाहतां, **अर्धा कोटी एकर** जमिनींत कापसाची लागवड होते; आणि सुमारें **सात लाख गठे कापूस दरसाल** सरासरीनें पैदा होतो.

आतां एकंदर महाराष्ट्रांत कापूस किती पिकतो याची अकरा वर्षांची सरासरी येणें प्रमाणें निघते.

		लाख	एकर	जमीनींत	कापूस
१	वऱ्हाड प्रांत	२२	,,	,,	,,
२	निजामी महाराष्ट्र	१९	,,	,,	,,
३	खानदेश.	१०	,,	,,	,,
४	दक्षिगप्रांत	१॥	,,	,,	,,

मिळून जवळ जवळ **पन्नास लाख** एकर जमीन महाराष्ट्रांतली कापसाच्या पिकांत दरसाल गुंतते असें स्पष्ट सिद्ध होतें.

१ गुजराथ ६ लाख एकर जमीन कापसाची.

२ कर्नाटक ८ ,, ,, ,, ,,

आणि सबंध मुंबई इलाखा पन्नासलाख एकर ज मिनींत कापूस पिकविणारा,

ह्मणजे,	५० लाख	एकर	मुंबई इलाखा.
	२२ ,,	,,	वऱ्हाड प्रांत.
	१७ ,,	,,	निजाम शाई.

असे मिळून सुमारें ९० **लाख एकर** जमीन कापसाच्या लागवडींत गुंतते आणि त्या पैकीं दरसाल

१	महाराष्ट्रांत	५० लाख	एकर.
२	गुजराथेंत	६ ,,	एकर.
३	कर्नाटक	८ ,,	एकर.
	मोंगलाई	२ ,,	एकर.
४	गुजराथी संस्थानें व इतर.	२४ ,,	एकर.
५	इतर सिंध वगैरे		

असें कापसाच्या लागवडीचें प्रमाण आहे. यावरून **निम्याहून जास्त कापूस** महाराष्ट्रांतला ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होत आहे. सुमारें पंधरालाख गठ्ठे कापूस मुंबईला येतो, त्यांत निम्यापेक्षां जास्त शुद्ध महाराष्ट्रांतला, हें चांगलें व स्पष्ट कळून येतें. आणि एवढी खात्री पटली ह्मणजे पुरे आहे. लागवड व पैदास यांत महाराष्ट्राकडे निम्याहून अधिकपणा आहे, एवढें कळणें हें पहिलें काम होय; व तें इतक्या विवेचना वरून संपलें व साधलें असें वाटतें.

कपाशींतले रोजगार

शेता पासून पेंठे पर्यंत कापूस पुष्कळांना पुष्कळ रोजगार पुरवितो. जमीनींत पिकणाऱ्या पदार्थांपैकीं कापूस रोजगार पुरवितो इतका कोणताच पदार्थ पुरवूं शकत नाहीं. किंबहुना कापसा इतका व्यापक व मोठा धंदा कोणत्याच पदार्थाचा नसतो. कापशीचें बीं -सरक्या—विकणें हा एक चांगला व मोठा रोजगार आहे. शेतांत पेरण्या साठीं, जनावरांचें खुराकी अन्न आणि अलिकडे अमेरिका व इंग्लंडकडे तेल काढण्यासाठीं रवाना, असे तीन मोठाले रोजगार कापसाच्या बींचे—सरकीचे—आहेत. तेल काढण्या साठीं विलायतेला सरकी भारी रवाना होते व तो एकंदर व्यापार युरोपकर व त्यांचे हस्तगत गुजराथी व्यापारी यांच्याच केवळ हातीं आहे. विलायतेस सरकीचें तेल निघतें तसें या देशांत कां निघूंनये व निघावयाचे तर त्याची एकंदर हालहवाल कशी, एतत्संबंधीं कानपूरच्या चेंबरआफकामर्सनें एक सविस्तर पत्रक गतसालीं तयार केलें. ह्मणजे कापशीच्या बीचा—सरकीचा-ही असा मोठा व्यापार आहे. कपाशीचें तेल, कपाशीचें तेल काढण्याची गिरणी हे रोजगार कांहीं लहानसान नाहींत.

कांपसाचे पेरे—हा धंदा शेतकींतला होय. कापूस पेरून तयार झाला कीं कापशींची उभीं शेतेंच्या शेतें

खरेदी करण्याचा प्रघात पुष्कळ ठिकाणीं आहे. शेतकरी कंगाल; त्याला पैशाची अडचणही सदा असावयाचीच. तेव्हां, कापशीचे उगवतें शेतच्या शेत धूर्त व्यापारी खरेदी करीत असतात. व्यापारी धूर्त, शेतकरी खुळसट. तेव्हां, शेतचें शेत खरेदी करण्याचा धंदा बराच किफायतशीर असतो. हा उभीं शेतें खरेदी करण्याचा रोजगार गुजराथी–जैन व वैष्णव–आणि मारवाडी, यांनींच चालविलला आहे. कापूस पेरणारा धनी शेतकरी व तो महाराष्ट्रीय व त्याची कमाई खरेदी करणारे व्यापारी गुजराथी व मारवाडी.

कपाशीच्या शेतांत वेंचणी कापसाची तीन, चार, पांच वेळां करावी लागते. तें मजूरीचें काम बाया, पुरुष हीं सर्व मजुरीनें करितात. ह्मणजे कापूस वेंचणीचा मजूरीचा धंदा हा शुद्ध महाराष्ट्रीयांकडे आहे. गोष्ट आनंदाची व अभिमानाचीच ह्मटली पाहिजे! कारण, शुद्ध मजूरींत स्पर्धा कोणाचीही नाहीं!!

कापसाची वेंचणी झाल्यानंतर वठणीचें काम असतें. वठणी ह्मणजे कापसांतली सरकी काढणें. हातचरकानें हें सरकी काढण्याचें काम आमच्या देशांत पूर्वीं होत असें; पण, सांप्रत हें काम वाफेच्या शक्तीवर चालविण्याचें मोठमोठाले कारखाने झाले आहेत. त्याला " जिनिंग

फ्याक्टरी " ह्मणतात. महाराष्ट्र देशांत या सरकी काढण्याच्या वाफेच्या शक्तीवरील कारखान्यांची संख्या जवळ जवळ तीनशें आहे! आणि हा सारा रोजगार गुजराथी, पारशी व युरोपकर यांच्याच केवळ हातीं आहे. कापसांतील सरकी काढण्याचें काम महाराष्ट्रीयांस करितां येत नाहीं व आलें नाहीं.

कापसांतली सरकी काढण्याच्या कामानंतर कापसाचे गठ्ठे बांधणें हें मोठे महत्वाचें आहे. वाफेच्या शक्तीवरच हें काम चालत असतें आणि या कारखान्यांची ही मालकी वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें महाराष्ट्रीय नव्हेत अशांची आहे. कापसाची खरेदी–विक्री हा मोठा धंदा महाराष्ट्रियांच्या हातीं मुळींच नाहीं. वाटेल त्या पेठेंत जा, गुजराथी,मारवाडी व युरोपकर हेच कापसाची खरेदी विक्री करीत असतात. खरेदी विक्रीची अडत-रोजगार महाराष्ट्रियांकडे होता पण तो सुद्धां सध्यां त्यांच्या हातीं नाहीं याची वार्ताही पुष्कळांस ठाऊक नाहीं. कापसाच्या खरेदी विक्रींत बोळेवाले-नमुना दाखविणारे-कोंटेवाले व भिकारी, हे मात्र संभावीत चोरी, सभ्यलूट व प्रतिष्ठित भिक्षा, या तिनी किंवा तिनींतून एका साधनावर, आपापलीं पोटें भरणारे महाराष्ट्रीय आहेत. **दलाल**-हा महाराष्ट्रीयच व खरेदी विक्रीचा माल-कापूस-तो इकडे ने-आण करण्याच्या कामीं **हमाल** लागतात ते महारा-

ष्ट्रीयच ! जिनिंग फ्याक्टरी-गठ्ठे बांधणारी गिरणी-येथील शुद्ध हमालांचें काम महाराष्ट्रीयां कडेसच आहे. तें कोणीं दुसऱ्यांनीं बळकावलेलें नाहीं व आमच्या महाराष्ट्रियांनीं बळकावूं दिलेंही नाहीं !!

सूत कांतणाऱ्या व कापड विणणाऱ्या गिरण्या ह्या व्यापारांतला मोठा व अजस्त्र धंदा आहे. सुमारें दहा पंधरा पेक्षां जास्त कोटि रुपयांचें भांडवल या कामीं गुंतलेलें आमच्या इलाख्यांत आहे. महाराष्ट्रियांचा या गिरण्यांत संबंध ह्मणजे गिरणींतले मजूर इतकांच. याच्या पलीकडे कांहीं एक नाहीं. सुमारें एक लाख महाराष्ट्रीय मजुरांची सोय गिरण्यांत होत आहे !

कापूस, सूत, कापड यांची ने-आण करण्याचें काम रेल्वे कंपन्याकडे. अर्थात महाराष्ट्रियांचा संबंध तेथें कांहीं एक नाहीं. केवळ अजीबात संबंध नाहीं असेंही पण ह्मणतां येत नाहीं. शेतांतून "जिनिंग फ्याक्टरींत" कापूस आणणें, गठ्ठे दाबण्याच्या गिरणींतून स्टेशनावर नेणें, स्टेशनावरले डब्यांत गठ्ठे चढविणें, स्टेशनावरून गिरण्यांत नेणें, हीं वाहतुकीचीं कामें, मनुष्याच्या डोक्यावरलीं किंवा बैलाच्या गाडींतलीं, केवळ महाराष्ट्रियांच्याच हातीं आहेत. इतरांची छाती नाहीं तें काम आपण घेण्याची! कापड व सूत खरेदी विक्रीही महाराष्ट्रियांच्या हातीं नाहीं. फक्त गिऱ्हाईक होणें हें काम महाराष्ट्र

आनंदानें करीत आहे व तेथें देशी कपडा वापरा असें त्याला सांगावें लागतें.

ह्मणजे कापसाचे इतके मोठे व असले दांडगे अनेक रोजगार आहेत पण तेथें शुद्ध मजूर, फक्त हमाल, यांच्या पलीकडे महाराष्ट्राच्या हातीं कांहींएक नाहीं व किफायत मजूरीच्या पलीकडे मुळीं कांहींच शक्य नव्हे, इतकी गोष्ट महाराष्ट्राला कळावी इतकाच प्रथम हेतु होय. आतां अशी स्थिति नसावी याला काय उपाय हा प्रश्न सुचतो व त्या प्रश्नाचें उत्तर देण्याचा प्रयत्न अवश्य आहे. उपाय योजना हें त्या विवेचनाला नांव द्यावयाचें योजून शक्य व साध्य त्या गोष्टींचा उहापोह करावयास हवा!

कापसाची लागवड उतरत्या कळेवर आहे.

सध्यां महाराष्ट्रांतल्या कापसाच्या लागवडीची स्थिति भारी असमाधानकारक आहे. साल दरसाल कापसाचे पेरे कमी कमी होत चालले आहेत आणि कापूस पिकविण्यांत येतो तोही भिकार अशापैकीं! अशी स्थिति असण्याचीं कारणेंही पण पुष्कळ आहेत. त्यांपैकीं कांहीं येणें प्रमाणें:—

लगेहात आणि लागोपाठ येणाऱ्या दुष्काळामुळें शेतकऱ्यांची भक्ति साहजिकपणें जवारीवर जास्त बसली. कडबा जनावरांना आणि धान्य माणसांना ज्वारी पासून

मिळतें तशी गोष्ट कापसाची नाहीं. कपाशी खातां येत नाहीं किंवा त्याचीं झाडें चारा नव्हेत.

२ शेतकऱ्यांपाशीं अनाज शिल्लक नाहीं व उसणवार मिळणें मुष्कील. हिरवा कच्चा दाणा व ओला कडबा ज्वारी पासून जलद व सहज मिळतो; तशी गोष्ट कापसाच्या पिकाची नाहीं.

३ जमिनी सावकारांकडे गेलेल्या; त्यांच्याशीं अर्धेली वगैरे केलेले शेतकरी फार. ज्वारी इत्यादि खातां येणारे व खाण्याचे पेरे केले असतां सहज रोज कांहींसें खावयास व चरावयास मिळतें; तसें कापसाच्या लागवडीचें नाहीं.

अशा तीन कारणांमुळें कापसाची लागवड झपाट्यानें कमी होत चालली. शेतकऱ्यांचें दारिद्र्य जसें वाढतें, त्या प्रमाणें कपाशीची लागवड कमती, असा बहुतेक सिद्धांतच होऊन बसला आहे. उपरि निर्दिष्ट कारणां खेरीज इतर अनेक कारणें कापसाच्या लागवडीच्या संकोच्याचीं आहेत. पण तीं किरकोळ होत.

लागवड जास्त होण्यास काय उपाय हवेत

कापसाची लागवड जास्त व वाढती हवी आहे; त्याच प्रमाणें कपाशीची जातही पण उंची पाहिजे. यास्तव हीं साधावींत कशी? हा पहिला प्रश्न सुचतो. व त्याचें

उत्तरही पण कांहीं कठीण नाहीं. उत्तम व अस्सल बीं पेरण्यासाठीं देण्याची–मिळण्याची तजवीज ही पहिली गोष्ट होय. कपाशीचें पीक विकलें जाई तों पर्यंत खाण्या साठीं उसणवार दाणा देण्याची सोय हें दुसरें काम आहे. आणि सरकारसारा भरण्याच्या कामीं कुमक ही तिसरी गोष्ट होय. मुंबईस " गिरणीधन्यांची सभा " The mill owners Association ह्मणून सभा आहे. म्यांचेस्टर येथें कापसाची लागवड वाढविणारांची सभा ह्मणून मोठी धनाढ्य मंडळी आहे. या दोघांच्या मदतीवर यांच्या सहानुभूतीनें, आमच्या महाराष्ट्रासाठीं एक " **कापूस पैदास मंडळी** " हवी आहे.

करावयाचीं कामें

या मंडळीनें कापसाच्या पैदासीच्या मोठमोठ्या ठिकाणीं आपलीं ठाणीं ठेवावीं. शेतकऱ्यांस कपाशींचें बीं पुरवावें; त्यांना बैल नसतील तर ते द्यावेत; त्यांना खाउटी साठीं धान्याचा पुरवठा करावा. सरकारसाऱ्या साठीं रकमा द्याव्यात. हीं सर्व कामें धंदेवाईकी पद्धतीवर, रोजगार ह्मणून, धर्मादाय नव्हे, करावींत. अशा पद्धतीच्या योगानें सारा पिकलेला कापूस मंडळीच्या हातीं येईल. व कापसाची खरेदी विक्री, कापूस वठविणें, कापसाचे गठ्ठे बांधणें व कापसाचा व्यापार हीं कामें अनायासें हातीं आल्याशिवाय राहणार नाहींत.

हल्लीं कापसांतले व्यापारी -**अदलाबदली** अशा पैकीं किंवा तेच अदलाबदली आहेत. व्यापाराचे प्रकार मुख्य असे दोन. एक अदलाबदली, इंग्रजींत Destributive असें ह्मणतात. **अदलाबदली** व्यापार ह्मणजे तयार असलेला माल इकडला तिकडे व तिकडला इकडे करणें. स्वयंपाकी आणि वाढपे, तसे **अदलाबदल** व **पैदासी व्यापारी**. पैदास करणारे व्यापारी आमच्यांत नाहींत. ह्मणजे स्वयंपाक सिद्ध करणारांचा तोटा. अदलाबदली व्यापारी फार. वाढपी मंडळी जास्त. कापसाच्या व्यापारांत सध्यां अदलाबदली व्यापाऱ्यांची दाटी मनस्वी आहे. पैदासी व्यापारांत गुंतलेले व गुंतणारे कोणी नाहींत. पैदासी व्यापार हातीं आल्यानंतर हे अदलाबदलीचें व्यापारी आपोआप आणि सहजासहज मुठींत सांपडल्या शिवाय राहत नाहींत. यास्तव आमच्या महाराष्ट्रांतील कापसाचा व्यापार सारा अदलाबदली व्यापाऱ्यांच्या हातीं आहे. महाराष्ट्रांतील कापसाच्या पैदासी व्यापारांत अद्यापि कोणी शिरलेले नाहींत. यास्तव हा पैदासी-व्यापार महाराष्ट्राच्या हातीं आला तर अदलाबदली व्यापाराची मग मुळींच पर्वा नाहीं. ह्मणून आधीं पैदासी व्यापार आह्मीं आपल्या हातीं घ्यावयास पाहिजे तो कसा घ्यावा हें सांगण्यांत आलेंच आहे.

महाराष्ट्राचें काम. सूत्रात्मक विवेचनाची फोड व्हावी तशी होणें जरा अवघड आहे. यास्तव जरा विस्तृत पणानें सांगणें अवश्यक दिसतें. ह्मणून तरुण व नव्यापिढीच्या महाराष्ट्रानें आतां व याउपर खालील गोष्टी करावयास पाहिजेत.

१ कापसाचा पैदासी–व्यापार Productive trade–आपल्या हातीं घ्यावा. अदलाबदली व्यापार Destributive trade आपोआप वेसणींत अडकवितां येतो.

२ पैदासी–व्यापार हातीं येण्या साठीं प्रत्यक्ष कुणब्याशीं, शेतकऱ्यांशीं संबंध व तो साक्षात असा ठेविला पाहिजे.

तो संबंध ठेवावयाचा ह्मणजे, त्याला कुमक, द्रव्य संबंधीं आणि सल्लामसलत, पीक तयार करणें व तयार केलेलें पीक उत्तम भावानें मुख्य बाजारांत व थेट खपविणारे गिराईक गांठण्याच्या कामीं, हवी. मधले व उगीच्या उगीचचे फाजील आहेत ते लुडबुड्ये कमी करण्या विषयीं झटलें पाहिजे.

४ मुंबईच्या गिरणी-धन्यांची सभा, म्यांचेस्टरची कापूस पैदा करणारी मंडळी व सहकारी तत्वें या तिहींच्या आश्रयाची सिद्धता असल्यावर द्रव्याची अडचण

शक्य नव्हे. या पेक्षां जास्त विवेचन करण्यांत अर्थ नाहीं. प्रत्यक्ष कामाला प्रारंभ कसा करावा हा प्रश्न स्वतंत्र आहे. काम कसें करावयास पाहिजे एवढें सांगणें अवश्यक होतें व तें सांगितलें आहे.

महाराष्ट्रांतला एक धंदा.

सुमारें सहाएक वर्षांखालीं, ह्मणजे इ० सन १८९७ सालीं, महाराष्ट्र देशांतील कोष्टीधंद्या संबंधाचा एक निबंध केसरीच्या वाचकांस सादर केला होता. त्या वेळीं माहिती तेवढी सांगण्यांत आली होती. या खेपेस, ती दिलेली माहिती अगदीं खरी कशी हें दाखविण्या साठीं प्रत्यक्ष प्रमाण सांपडलें तें सादर केलें आहे आणि त्याच निबंधाचा अनुवाद पुनः येथें करणें अवश्यक वाटतें. आमच्या **महाराष्ट्र देशांतला मुख्य धंदा एक तो कोष्टी लोकांचा.** मराठ्यांच्या राजधान्यांची ठिकाणें व सत्तेचा मुलूख, कीं, तेथें कोष्टीलोकांचा धंदा नामांकित हा असावयाचाच, हें स्पष्ट दिसतें. **नागपूर, अमदाबाद, बऱ्हाणपूर, निपाणी, शहापूर, बागलकोट, हुबळी, अक्कलकोट, सोलापूर, नगर, भिंगार, येवलें, रबकवी, तेरदाळ, बनहट्टी,** इत्यादि ठिकाणें कोष्टी-कामा साठीं प्रख्यात होत. **इंदूर, चंदेरी, उज्जन,**

महेश्वर, हीं मराठे शाईतली, महाराष्ट्रा बाहेरच्या मुलुखांतलीं ठिकाणें, कोष्टी धंद्या साठीं नामांकित आहेत. **मराठ्याच्या अमदानींत कोष्टीधंद्याला फारच नामी उत्तेजन मिळत असलें पाहिजे असें दिसतें.**

ही एक सहज सुचणारी गोष्ट झाली. दुसरी गोष्ट अशी आहे कीं गिरण्यांची वाढ झाली व होत आहे त्या मानानें हातमागां वर काम करण्याचा धंदा बसेल असें अनुमान पुष्कळ जण करितात; पण तें खरें नव्हे. गिरण्यांच्या वाढी बरोबरच हातमागाची वाढ होत आहे व गिरण्यांच्या दारांशींच हातमाग जास्त जास्त झालेले दिसतात. अंकानुमान व प्रत्यक्ष दिसतो तो प्रकार पाहूं लागलें ह्मणजे गिरण्यांसारख्या वाफेच्या अजस्त्र कारखान्यांची वाढ हातमागांच्या धंद्याला मुळींच हरकत करीत नाहीं, एवढेंच नव्हे तर गिरण्यांमुळें हातमागांस **बरकत** आलेली आहे, व गिरण्यांतल्या कामास कुमक हातमागच करतील. हें ह्मणणें प्रारंभी भारी चमत्कारिक वाटण्यासारखें आहे. परंतु खरी स्थिति अशी आहे. आपली बरकत व्हावी अशी इच्छा असेल तर, **गिरणीवाल्यांनीं हातमागांच्या कोष्ट्यांस हातीं धरलेंच पाहिजे.** ही गोष्ट याच लेखकानें इंग्रजी भाषेंत 'टेक्सटाईल जर्नल नामक मुंबईच्या मासिक पुस्तकद्वारें प्रसिद्ध

केलेली आहे; व त्याविरुद्ध हा वेळपर्यंत कोणीं कांहीं एक ह्मटलेलें नाहीं.

मुंबईच्या गिरणीवाल्यांस सांप्रत अति कठिण दिवस आलेले आहेत. चीनदेशांत कायतो सुताचा खप. तो बाजार सांप्रत हातचा सुटत चालला. **जपान** देशांत गिरण्यांची वाढ होत आहे व **चीनचा** बाजार **जपानी** लोक बळकावीत सुटलेले आहेत. आपण इतकें सूत काढितों हें खपेल कोठें व कसें, हा मुंबईच्या गिरणीवाल्यांस प्रश्न पडला आहे. जवळ उंबरक्या शेजारीं खप होण्याची जागा आहे ती टाकून बाहेर देशीं भटकत गिराईक शोधण्याचा आजवरचा शहाणपणा मुंबईच्या गिरणीवाल्यांनीं आतां पुरे करावा.

हातमागां वर काम करणारांना गिरणीवाल्यांनीं जवळ केलें व त्या कोष्टी लोकांस सारखे लुबाडीत सुटलेल्या कोष्टी-सावकारास जरा दूर केलें ह्मणजे, हल्लीं खपतें यापेक्षां जास्त सूत खपून लोकांस जास्त सवंग कपडा हटकून मिळणार आहे. हल्लीं महाराष्ट्र देशांत **खप** आहे इतका हातमागांवरच्या कपड्यांचा पुरवठाच मुळीं होत नाहीं. याला प्रमाण पहावयाचें असल्यास थोडें आंकडेशास्त्र पाहिलें पाहिजे.

मराठी भाषा बोलणारांची संख्या **दोन** कोटि आहे.

इ. स. १८९१ सालच्या खानेसुमारीच्या रिपोर्टांत बेन्स साहेब ह्मणतात, मराठी बोलणारांची संख्या १ कोटी ८८ लक्ष ९२ हजार ८७९ अशी आहे. आतां १९०१ ची खानेसुमारी कशी आंकडे दाखविणार तें आज सांगतां येत नाहीं; पण दोन कोटि लोक मराठी भाषेचे असें ह्मणण्यास कांहीं एक हरकत नाहीं. या दोन कोटि मराठी भाषा बोलणारांत बायका लुगडीं नेसणाऱ्या किती हा आंकडा बरोबर कळत नाहीं. कोणी ह्मणतो ६० लक्ष, कोणी ७० लक्ष, तर कोणी सांगतो ८० लक्ष. आपण साठ लक्ष लुगडीं व साड्या नेसणारी लोकसंख्या माराठी भाषा बोलणारांची, असें धरून चालावें हें बरें.

मराठी भाषा चालते त्या मुलखांत, खेडेंपाडें सुद्धां धरून, एकंदर माग पांच लाखापेक्षां कमी नाहींत असा अदमास आहे. दर एक मागावर कमींत कमी दरसाल पंचवीस लुगडीं निघतात अशी आपण कल्पना केली, तर साल अखेरीस सव्वा कोटी लुगडीं तयार होतात. व महाराष्ट्रांत खप आहे जवळ जवळ दीड कोटी लुगड्यांचा. यांत खण, पागोटीं, खादी व इतर कापड, धोत्रें व उपरणीं, बंड्याचें कापड यांचा हिसाब धरलेला नाहीं. याशिवाय डोक्याला बांधण्याचे रुमाल यांचा खप आहे तो निराळाच. सुमारें दीड कोटि डोक्याला बांधण्याचे

रुमाल महाराष्ट्र व दक्षिण महाराष्ट्र येथें दरसाल खपतात आणि ते सारे मद्रासेकडून येतात. महाराष्ट्रांत हे रुमाल विणले जात नाहींत. कारण रुमालांची रुंदी जास्त असल्याकारणानें एका मागावर व एका कोष्टयाकडून हे रुमाल विणतां येत नाहींत. फार मोठा माग व बऱ्याच अंतरावर एका शेजारी दोघे तिघे असे कोष्टी बसून रुमाल विणावे लागतात.

या एवढ्या हकिकतीवरून खप आहे त्या मानानें कोष्टी लोकांकडून उपज (पुरवठा) होत नाहीं हें उघड आहे. शिवाय हा हातमागांवरला माल सध्यां महाग पडतो, तो फारच सवंग करितां येण्याजोगा आहे. तो माल तसा जास्त सवंग झाला ह्मणजे खपही अनायासें वाढेल. कोष्टी लोक शेतकऱ्यां प्रमाणें उपजत निर्धन व कंगाल असतात. सावकारांनीं द्यावें तेव्हां त्यांचा माग चालणार. सावकार कोष्ट्यां पासून आपली तुंबडी कशी भरीत सुटतो याची कोणा पांढरपेशास कल्पना सुद्धां यावयाची नाहीं. मागें, ३ वर्षांखालीं, तो कोष्टी लोकांपासून किफायत कशी काढीत सुटतो हें आंकडे देऊन दाखविलें होतें व ते आंकडे खरे याला नुक्तेंच एक प्रमाणही मिळालें आहे. तें सादर करण्याचा मुख्य हेतु आहे.

शंभर रुपये रोकड भांडवल असलें ह्मणजे ते कमींत कमी दरमहा चार वेळां तरी फिरतें, ह्मणजे शंभर रुपयां वर एका वर्षांत अठ्ठेचाळीसशेंची उलाढाल करितां येते. एका मागाला एका आठवड्यास कमींत कमी दहा रुपये व जास्त ह्मणजे वीस रुपये भांडवल पुरें होतें. कच्चा माल कोष्टीलोकांचा ह्मणजे सूत, रेशीम, रंग हे तीनच. सणंग अडीच दिवसांत तयार होतें असें आहे. तरी कच्च्या मालाचा पक्का माल बनून घातलेले रुपये परत येण्यास आठ दिवस लागतात, असेंच सध्यां आपण धरून चालूं. कोष्टी लोकांस सुताचा पुरवठा करणार सावकार. कोष्टीलोकांजवळ सूत नसतें; कोष्टी सावकारा कडून सूत घेतो. दाम मात्र रोख देत नाहीं. मीं सूत खरेदी करून तुह्मांस देतों व याबद्दल रुपया मागें एक आणा फायदा हें सोपें मागणें सावकार मागतो; कोष्टी कबूल करितो. पण रुपया मागें एक आणा याचा अर्थ वर्ष अखेरीला भलताच होतो ! महिन्यांतून एकच खेप सूताची रक्कम सावकारास मिळाली असें धरिलें तरी महिना सवा-सहा रुपये ह्मणजे दरसाल पंच्याहत्तर रुपये होतात. शंभर रुपये मूळचें भांडवल; तें समजा बारा वेळां उलथें पालथें झालें; (वास्तविक पाहतां कमींत कमी ९० वेळां होतें) ह्मणजे शंभर रुपयांवर ७५ रुपये दर-

साल कोष्ट्याचे सावकारास मिळाले. यापेक्षां जास्त मिळतात पण कमींत कमी धरिले तर ७९ रुपये होतात!

माल उधारीनें नेला ह्मणून त्याला रुपया एक प्रमाणें व्याज. सणंग तयार झालें ह्मणजे तें आपणच विकत घ्यावययाचें व सणंगापाठीमागें गेलाबाजार एक आणा हा आहेच. अशा तऱ्हेनें आपल्यापाशीं जमलेला कापडमाल सावकार विकणार, तो फायदा पुनः निराळाच.

ह्मणजे, एक शंभर रुपये कोष्टी लोकांस सावकारानें दिले, तर त्याचा हिशोब येणेंप्रमाणें त्याच्या वहींत होतो:—

१ मूळ भांडवल रुपये १००	
२. हे बारा वेळा फिरले. दर खेपेस रुपया मागें एक आणा फायदा १०० × १ = १०० आणे = ६ रु. ४ आ. ६। × १२.	७९
३. उधार मालाचें व्याज दरसाल दर शेंकडा १०%	१२
४. संणग आपणच विकत कोष्टी लोकांकडून घेतलें तें, दर सणंगास १ आणा.	३७
९. कापडविक्रीची अडत शेंकडा ८ आणे.	६
एकूण रुपये	१३०

शंभर रुपयांस बारा महिन्यांत एकशें तीस फायदा, हा अगदीं कमींतला कमी असा सावकाराला आहे. एकशें नव्वदपर्यंत फायदा झालेलीं उदाहरणें अनेक दाखविण्याची तयारी आहे.

हा हिसाब पाहिला झणजे जों जों कोष्टी लोक झटून व झपाझप काम करतील, तों तों जास्त जास्त फायदा सावकारांचाच होणार. हा एक चमत्कार ध्यानांत टेवण्यासारखा आहे. असो.

कोष्टीकामांत सावकार लोक अशी किफायतीची लूट करितात याचें एक ताजें व स्वच्छ उदाहरण येथें सादर करितों. सोलापुरास वीस हजार संख्या फक्त विणकर लोकांची आहे. रा. त्रिंबकराव पित्रे एल. सी. ई. हे तेथील म्युनिसिपालिटीचे सेक्रेटरी. गेल्या सालच्या दुष्काळांत सोलापूर म्युनिसिपालिटिनें कोष्टीलोकां साठीं काम काढिलें. ता. १६ फेब्रुवारी १९०० इसवी रोजीं कारखान्यास सुरवात केली. म्युनिसिपालिटीच्या खजिन्यांतले दोन हजार रुपये या कोष्टीलोकांच्या कारखान्याकडे घेतले. दोन हजार रुपयांवर कारखाना चालू केला. सरकार या कामासाठीं दहा हजार रुपये देणार होतें. पण कागदी घोडे नाचविण्याखालीं सारा वेळ निघून गेला ! तरी सेक्रेटरी यांनीं

चांगलें मनावर घेऊन व्यापारी दृष्टीनें कामाची व्यवस्था ठेविली. तारीख ३१ डिसेंबर १९०० रोजीं कारखाना बंद केला; कारण, जो तो कोष्टी स्वतःच्या कामावर निघून गेला. दहा महिने कमिटीनें कोष्टी लोकांचा कारखाना चालविला. यांत कमिटीचें पहिलें प्रथम घातलेलें भांडवल परत घेतलें जाऊन कमिटीस निव्वळ नफा **तेवीसशें त्रेचाळीस** रुपये झाला! आज शिलक माल कांहीं एक नाहीं ! दोन हजार रुपयांवर दुष्काळचे दिवसांत, अकरा महिन्यामध्यें, कारकून लोकांकडून काम करवीत, सोलापूर कमिटीनें **तेवीसशें रुपयांची** निव्वळ रोकड कमाई कोष्टीकामांत केली !

या कमीटीचा हा हिसाब ह्मणजे, एक रुपयास एक वर्षाला एक एक रुपयापेक्षां जास्त फायदा, ही गोष्ट चांगली ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. तेव्हां कोष्टी लोक व त्यांचे सावकार यांचे हे असे प्रकार असल्यामुळें देशी कपडा विनाकारण महाग पडतो. तो स्वस्त सहज करितां येईल. मुंबईचे गिरणीवाले या कामीं मदत देण्यास तयार आहेत. पण काम करण्यास कोणी असतील तर त्यांनीं पुढें या वेळीं यावें, इतकाच हा मजकूर लिहिण्याचा हेतु आहे.

धांवता-धोंटा.

आपल्या महाराष्ट्र देशांत शेतकीच्या खालोखाल

मोठ्या महत्वाचा धंदा ह्मणजे हातमागावरील विण-कामाचा होय. एकंदर कारागिरांची लोकसंख्या १०० धरली तर ६० किंवा ६५ इतके लोक कोष्टी असतात. ह्मणजे, कारागिरी धंद्यात शेकडा ६० किंवा ६५ हें एवढें मोठें प्रमाण या कोष्टी धंदेवाल्यांचें व विणकामाचें असतें. यास्तव शेतकी व शेतकरी या प्रश्नाच्या खालोखाल महत्व कोष्टी व विणकाम यांजकडे येतें. या शिवाय विणकामाच्या धंद्याशीं महाराष्ट्र देशाचा मोठा निकट संबंध पुरातन काळा पासून आहे. तो कां व कसा हें मात्र अद्याप नीटसें कळत नाहीं. महाराष्ट्र वीरांची समशेर व कोष्टी लोकांचा धोंटा याचा कांहीं चमत्कारिक संबंध आढळतो. महाराष्ट्र सार्वभौम सत्तेच्या कृपाछत्रा खालीं कोष्टी लोकांचा धोंटा अनिरुद्ध पुष्ट होत असे, असें आढळतें. नागपूर, बऱ्हाणपूर, महेश्वर, अहमदाबाद, निपाणी, शहापूर, बागलकोट, अक्कलकोट, बेळगांव, रबकवी, बनहट्टी, तेरदाळ इत्यादि कोष्टीकामाच्या दरोबस्त नामांकित पेठा मराठ्यांच्या साम्राज्यांत उदय पावलेल्या ही गोष्ट अगदीं सिद्ध आहे. हल्लीं इंग्रजी साम्राज्यांत देशी कापडाला उत्तेजन देण्याची देशाभिमानी लाटही महाराष्ट्र देशांतच उदय पावली. कोष्टीधंद्याच्या जीर्णोद्धाराचा विचार व प्रयत्न याचें श्रेयही सर्वस्वी महाराष्ट्राच्या वाट्यास आलें पाहिजे, हें रास्त आहे. परंतु तसा भरंवसा मात्र वाटत नाहीं.

म्हणून कोष्टी धंद्यांतल्या एकदोन महत्वाच्या मुद्या संबंधीं विचार करण्याचा प्रयत्न योजिला आहे. मागें दोन वेळां 'केसरी' पत्रांतून महाराष्ट्र देशांतील या महत्वांच्या धंद्याची परिस्थिति कशी आहे याचें बरेंच विवेचन केलेलें होतें. आज त्या धंद्यांतील कांहीं महत्वाच्या सुधारणेच्या संबंधानें विचार कर्तव्य आहे. बंगाल्याचे मि. हावेल, मद्रासचे मि. चाटरटन, मुंबईचे मि. डेनिंग्स व मद्रासचे आनरेबल निकोलसन या चौघा इंग्रजी सद्गृहस्थांनीं आमचे कोष्टी, त्यांचा विणकर **धंदा** व त्यांच्या मागांतील **धांवता-धोंटा** एतत्संबंधीं पुष्कळ चर्चा सुरू केली आहे. इंग्रजी पत्रें व मासिक पुस्तकें या कोष्टी-धंद्यांतल्या प्रश्नांची चर्चा करीत आहेत. ख्रिस्तीधर्मप्रसारकांनीं या कोष्टी धंद्याला दुष्काळांत आपल्या मांडीवर घेतल्यासारखें केलें. शिवाय स्टेट सेक्रेटरी व हिंदुस्थानसरकार यांनीं **धांवत्या धोंट्याचा** शांत विचार चालविल्याचें पार्लमेंटांतील **प्रश्नोत्तरावरून** कळतें. तेव्हां शिळ्या कढीला ऊत आणण्याचें तरी काम, महाराष्ट्रानें केलें पाहिजे!

कोष्टी लोकांच्या मागांत **धोंटा** असतो. ताण्यामधून (लांब सुताचे उभे धागे) डावीकडून उजवीकडे-डाव्या व उजव्या हातानें-हा **धोंटा** कोष्टीलोक फेंकीत असतात. फार रुंदीचें कापड असलें तर दोन बाजूला दोन मुलें

किंवा बायका इकडून तिकडे **धोंटा** फेकण्याचें काम करितात. परंतु सुमारें शंभर दीडशें वर्षांपूर्वी इंग्लंडांत एकानें युक्ति शोधून काढिली व धोंट्याच्या दोन टोंकाला दोरी बांधून ती एका लहान तरफेनें (Lever) हालविली असतां **धोंटा** आपोआप व इकडून तिकडे फिरावयास लागतो, हें सर्वांच्या निदर्शनास आणून दिलें. (*Fly-shuttle*) **धांवता-धोंटा** हें त्याचें नांव. वाफेच्या गिरणींतले सर्व धोंटे असेच **धांवते** असतात. ह्मणजे आपोआप इकडून तिकडे धोंटा धांवत जातो. त्याला डाव्या हातानें उजवीकडे व उजव्या हातानें डावीकडे फेंकण्याची गरज पडत नाहीं. हा **धांवता धोंटा** अमलांत आणावा असा उपदेश अव्वल इंग्रजींत एका महाराष्ट्रीय विद्वानानें मराठी भाषेंत शिळाछापावर पुस्तक लिहून केला, पण तिकडे आजवर कोणी लक्ष दिले नाहीं. इंग्रजांचें तुरुंग आहेत त्या प्रत्येक ठिकाणीं या धांवत्या धोंट्यावर विणकाम चाललेलें असतें. बंगाल्यांत सिरामपूर ह्मणून गांव आहे, तेथें डच लोकांच्या अमदानींत या फ्लाय शटलची-धांवत्या धोंटयाची-पुष्कळ दिवसापासून सुरवात आहे. हावेल नामक इंग्रज गृहस्थानें बंगाल्याकडे असले धांवत्या धोंटयाचे एक हजारापेक्षां जास्त माग लोकांत खपविले आहेत. मद्रासच्या कलाकौशल्यशाळेंत ९०।६० धांवत्या धोंटयाचे मागावर विद्यार्थ्यांना काम शिकविलें जातें. असा या धांवत्या धोंटयांचा हळू हळू पण सत्वर प्रसार

चालला आहे. महाराष्ट्र देशांत चाळीस पन्नास वर्षांपूर्वी धांवता-धोंटा असलेला माग प्रचारांत आणा म्हणून एका ग्रंथकारानें उपदेष केला व त्या धोंट्याचे फायदे दाखविले. पण त्याचा उपयोग अरण्यरोदना पलीकडे झाला नाहीं, याचें सखेदाश्चर्य वाटतें! असो. झाली गेली गोष्ट होऊन गेली. ज्याचें त्यानें कर्तव्य केलें होतें. यानंतर तरी **धांवता धोंटा** प्रचारांत आणण्याचा प्रयत्न महाराष्ट्रानें करावयास पाहिजे व तो त्यानें केला तर, त्याचा त्यांत फायदा आहे.

परंतु आरंभींच आणखी एक दोन प्रश्नांचा विचार करावयास पाहिजे व तो तसा विचार झाल्याशिवाय **धांवत्या धोंट्याकडे** महाराष्ट्राचें लक्ष जावयास पाहिजे तितके जाणार नाहीं. वाफेच्या शक्तीनें चाललेल्या गिरण्या रोजच्या रोज आमच्या देशांत वाढत आहेत. वाफेनें विणकाम चाललेलें आहे; परदेशी मोहक कपडा **सवंग** व **सुंदर** लागेल तितका व लागेल त्या ठिकाणीं मिळत आहे; या सध्यांच्या कालांत आमचें हातमागावरील विणकाम किती मिनिटें टिकाव धरील ? वाफेच्या जबरदस्त शक्तीपुढें हातमागावर " लटल लटल " करणारा धोंटा फेंकीत बसणारा कोष्टीवर्ग स्पष्ट व सत्वर आपल्या हातचा धंदा टाकून भटकत फिरावयास लागलाच पाहिजे व मृत्युच्या जबडयांत घुसलेला **धंदा** ऊर्जीत दशेला येणें

शक्य नव्हे; व अशक्य धंद्याच्या पाठीस लागणें यासारखा मूर्खपणा कोणताच नाहीं; अशी समज या कोष्टीकामासंबंधानें पुष्कळांची आहे. त्यामुळें हा हातमागावरील कोष्ट्याचा विणकर धंदा ऊर्जीत दशेला आणण्याचा विचार सुद्धां कोणापुढें काढतां येत नाहीं. असा प्रकार आहे. परंतु **वाफेच्या गिरणींतल्या विणकामापुढें हा हातमागावरील धंदा बुडणें शक्यच नव्हे**, असा खरा प्रकार आहे. गिरण्या वाढत जातील तसे हातकामावरील काम वाढत जातें व गेलेंच पाहिजे यांत काडीभरही शंका नाहीं. आतां हें कसें तें सिद्ध केलें पाहिजे, त्याशिवाय कोणांस खात्री पटावयाची नाहीं.

मि. हॅवेल आपल्या व्याख्यानांत ह्मणतात:—

"It is my firm belief that there is hardly a more safe and lucrative field open for Native & European capitalists in India than there is in the development of hand-loom weaving."

याचा मराठींत गोषवारा येणेंप्रमाणें:—हातमागावरील कामाची अभिवृद्धि करणें याच्यापेक्षां हिंदुस्थान देशांत सुरक्षित व किफायतशीर धंदा देशी व विलायती भांडवलवाल्यांस दुसरा कोणता नाहीं अशी माझी दृढ समजूत आहे.

मिस क्लाइव्ह बेली नामक एक आंग्लकुमारी हातमागावरील कामाची कैवारीण विलायतेस आहे. इंग्लंड देशांत हल्लीं दिवसेंदिवस हातमागावरील कामाची सारखी वाढ होत चालली आहे. एकीकडे गिरण्याची संख्या वाढते व एकीकडे हातमागावर कापड काढण्याचें काम झपाट्यानें चाललें आहे, असा प्रकार खुद्द इंग्लंडांत आढळतो. मिस क्लाइव्हबाईचीं छापील व्याख्यानें वाचलीं ह्मणजे ही गोष्ट मनाला चांगली पटते. कलकत्त्याच्या सरकारी शिल्पशाळेचे मुख्याध्यापक ह्मणतातः—

" If the hand-loom can compete with the power loom in England, where the cost of skilled labour is many times greater than it is in India, where the supply of trained weaver is very limited and where the most perfect weaving machinery worked by steam and electricity is in use, what a much greater prospect must be for it in India, where you have an unlimited supply of the most skilful hereditary weavers content with the earning of four annas to eight annas a day."

याचा मराठींत तर्जुमा येणेंप्रमाणें:—

हिंदुस्थानापेक्षां मजुरीचे दर इंग्लंडांत किती तरी महाग आहेत. उपजत तरबेज आणि वंशपरंपरेनें धंद्यांत प्रवीण अशी कोष्टी लोकांची संख्या हिंदुस्थानांत मुबलक आहे तशी इंग्लंडांत नाहीं. वाफ व विद्युलता या प्रचंड शक्तीच्या जोरावर चालणारे माग इंग्लंड देशांत अगदीं

परिपूर्णावस्थेस आलेले आहेत; तरीसुद्धां इंग्लंड देशांत आजमितीस वाफेच्या शक्तीवर चालणाऱ्या मागांशीं हातमाग चांगली टक्कर देतात, हा प्रकार इंग्लंडांत शक्य आहे. तर मग हिंदुस्थानची गोष्ट कशाला पाहिजे? रोज चार आण्यापासून आठ आणे मिळविण्यांत तृप्त राहणारा उपजत कुशल व पिढ्यान पिढ्या तरबेज असा असंख्य कोष्टीसमूह हिंदुस्थानांत आहे, तर हातमागाची भरभराट, शक्तीवर चालणाऱ्या मागांपुढें किती तरी होणें साहजिक आहे.

" With proper looms and proper instruction the Indian weaver could not only recover a deal of the lost internal trade but take a leading position in the world in hand-woven fabrcis. "

ह्मणजे " योग्य प्रकारचे माग आणि योग्य असें शिक्षण दिलें असतां हिंदुस्थान देशचे कोष्टी आपला गमावलेला अंतर्गत व्यापार पुनः काबीज करतील, इतकेंच नाहीं, तर हातमागांवर जगांत निघणाऱ्या कापडाच्या कामांत बरेच पुढें सरसावतील " हेंही हावेलचें मत आहे. मद्रासचे आनरेबल निकोलसन यांनीं " शक्तीनें चालणारे माग व हातमाग यांची स्पर्धा " याविषयीं लिहितांना, खेडेगांवांत हातमागावरील कामच भरभराटीनें चालेल यांत तिळमात्र शंका नाहीं, असें अगदीं मुद्देसूद सिद्ध केलें आहे. मुंबईच्या टेक्स्टाईल जर्नलमध्यें हातमागाला गि-

रण्यांतील मागाची स्पर्धा बिलकुल आड येऊं शकत नाहीं, असा अनुभव येतो तो सिद्ध करून दाखविला आहे. मद्रासचे सरकारी शिल्पशाळेचे मुख्याध्यापक चाटर्टन, कलकत्याच्या सरकारी शिल्पशाळेचे मुख्याध्यापक हावेल, मद्रास सरकारचे कौन्सिलदार व उद्योग धंद्याचे माहितगार पठाईत सरकार कामदार मि. निकोलसन, मुंबईचे डेनिंग्स व टेक्सटाईल पत्रकार इतक्यांचें मत हातमागावरील विणकाम गिरण्यांपुढें निस्तेज होणें शक्य नव्हे असें आहे.

"धांवत्या धोंट्या" संबंधाचा थोडासा इतिहास देऊन मग इतर बाबींचा विचार करणें इष्ट दिसतें. इ. स. १७६० सालीं इंग्लंड देशांत हा धांवता धोंटा प्रारंभीं उपयोगांत आणिला. इ. स. १७८४ सालामध्यें अर्थर यंग यानें "एका कोष्टयाच्या हातून दोन कोष्टया इतकें काम घेण्याची युक्ति" ह्मणून या धांवत्या धोंट्यासंबंधाची प्रसिद्धी केली. हिंदुस्थानांत ब्रिटिश सरकारानें या धांवत्या धोंट्याचा माग पुष्कळ वर्षांमागें सिरामपुर येथें युरोपांतून आणविला व त्या मागावर काम करण्यास पुष्कळांना शिकविलें. हुगळी (कलकत्ता) व सिरामपूर इकडे मात्र हे **धांवतें धोटे** बरींच वर्षे उपयोगांत असल्याचें इ. स. १८९० सालीं उघडकीस आलें! जर्मन मिशनरी लोकांनीं धांवत्या धोंट्याचे माग पुष्कळ वर्षां-

पासून दक्षिण हिंदुस्थानांत चालविले. महाराष्ट्र देशांत अव्वल इंग्रजीमध्यें एका महाराष्ट्र विद्वानानें मराठी भाषेंत धांवत्या धोंट्यावर पुस्तक लिहिलें. इंग्रजसरकारच्या मोठमोठाल्या तुरुंगांत कैदी लोकांकडून विणकाम घेतात तें या धांवत्या धोंट्याच्या मागावरच. एकोणीसशें सालीं हावेल साहेब कलकत्त्यास, चाटर्टन मद्रासेस व एक बाबू बंगाल्याकडे या धांवत्या धोंट्याचा प्रसार जास्त करण्याकडे मेहनत करूं लागले!

इतका हा थोडका **धांवत्या धोंट्याचा** "इतिहास" आहे. धांवत्या धोंट्यासंबंधीं थोडक्यांत "महात्म" वर्णन करावयाचें तें येणेंप्रमाणें.

(१) **धांवत्या धोंट्यापासून फायदे**—या धांवत्या धोंट्याचे मुख्य फायदे तीन. पहिला असा कीं, हातानें इकडुन तिकडे धोंटा फेंकीत विणण्यापेक्षां या धांवत्या धोंट्यानें काम फारजलद होतें. एरवींच्या मागांतील धोंट्याच्या बरोबर दुपटीनें काम धांवत्या धोंट्यानें निघतें. सारखी वेळ, सारखें व चांगलें काम (मात्र तें काम दुप्पट) हा धांवत्या धोंट्याचा पहिला फायदा. दुसरा फायदा असा कीं फेंकणाऱ्या धोंट्यानें जास्त रुंद काम निघत नाहीं. धांवत्या धोंट्यानें वाटेल तेवढ्या रुंदीचें कापड काढितां येतें. तिसरा फायदा, ह्या धांवत्या धों-

त्याचा माग वाटेल त्या खेड्यांत सुद्धां तयार करितां येण्यासारखा आहे. किंमत फार कमी; खेडेगांवचा सुतार हे माग करूं शकतो. आणि एरवीच्या मागात थोड्याशा सुधारणेनं हा धोंटा बसविण्याची सहज तजवीज होते.

(२) **या धोंट्याची किंमत**–(नुस्ता धोंटा व त्याची पेटी, आणि या धांवत्या धोंड्याचा सबंध माग असे दोन प्रकार आहेत.) त्या किंमती संबंधानें ठाम असें आजच सांगणें कठिण आहे. सोलापुरास प्रयोग चालू आहेत. मद्रासेला व कलकत्यास विकत मिळतात त्यापेक्षां महाराष्ट्रांत सवंग माग होतील असें अनुमान आहे. व इतक्यांतच महाराष्ट्रांत या मागाचा एक कारखाना निघणें शक्य दिसतें. ह्मणून त्यासंबंधीं आज कांहीं ठाम सांगता येत नाहीं. तथापि कमींत कमीं दहा रुपये व अधिकांत अधिक सत्तर रुपये, नुस्ता धोंटा धांवण्याची पेटी–त्याला इंग्रजीत "ले" ह्मणतात त्याची, व सबंध लांकडी माग बसण्याची बैठक, पायानें काम चालविण्याची व कापड गुंडाळण्याची व सूत उकलत जाण्याची सोय असलेल्या मागाची–असा अंदाज आज सांगता येण्यासारखा आहे.

(३) धांवता–धोंटा वापरण्याची वाकबगारी येण्याला किती अवकाश लागतो हा प्रश्न पुष्कळ जण

विचारतील तर त्याचें उत्तर; उपजत कोष्टयाला पूर्ण निष्णात होण्याला अधिकांत अधिक एक महिना ह्मणजे फार व इतर नवशिक्यांना दोन किंवा तीन महिने पुष्कळ झाले.

(४) किफायत—एरवींचा माग चालविल्यानें फार फार तर भिकार मजुरी वजा करितां दरमहा चार रुपये शुद्ध फायदा राहतो. व या धांवत्या धोंटयाच्या मागावर सात रुपये, नऊ रुपये, दहा, असे अंदाज व अनुभव कलकत्ता व मद्रास इकडे आलेले आहेत.

या शिवाय धांवत्या धोंटयानें कोणकोणचें व काय काय काम निघतें, कांठ काढण्याचें काम करण्याला काय अडचणी येतात इत्यादि शुद्ध धंदेवाल्याच्या अनुभवाचे प्रश्न उरले.

त्याचा खुलासा ह्या धांवत्या धोटयाचा व्यापार करणारांकडून माहिती घेतली असतां कळून येईल.

समाप्त.

ग्रंथियुक्त तापावर दवा.

अलिकडे ह्या ग्रंथीयुक्त तापाच्या साथीच्या दिवसांत जर बाटलीवाला यांचे तापावरील रामबाण औषध, एग्यु-मिक्श्चर व गोळ्या, ह्या सारखा स्वल्प उपाय करण्याची हयगय झाली तर आयुष्यांतील यातना किती तरी वाढतात!

बाटलीवाला यांचे एग्युमिक्श्चर व गोळ्या एकांतर, चातुर्थीक, हिंवताप, व सौम्य ग्रंथियुक्त ताप (प्लेग), वगैरे सर्व प्रकारच्या तापांवर रामबाण व अचूक लागू पडतात. ह्या विषयीं आतां सर्वत्र प्रसिद्धी आहे. यांत वारा, सोमल, अफू वगैरे सारखे अपायकारक पदार्थ बिलकुल नाहींत. लहाना पासून थोरापर्यंत स्त्री पुरुषांना घेण्यायोग्य आहेत. तर मग अगोदरच शहाणे होऊन दुःखमुक्त कां होऊंनये. योग्य वेळीं योग्य उपाय करा! व बाटलीवाला यांचें तापावरील रामबाण औषध, एग्युमिक्श्चर व गोळ्या, घेऊन कष्टतर तापाच्या तडाक्यांतून मोकळे व्हा.

बाटलीवाला यांच्या एग्युमिक्श्चर व गोळ्या यांच्या गुणा विषयीं असंख्य शिफारस पत्रांपैकीं कांहीं खालीं देतोः- सर्जनमेजर जेकरसाहेब ह्मणतात " ह्या सारखा निर्भय व विश्वासनीय दुसरा उपाय नाहीं." सर्जन मेजर रिपोर्टर साहेब ह्मणतात " हीं औषधें अत्यंत गुणकारक आहेत अशी मी खात्री देतों." जे. वाय. लँग साहेब (हिंदुस्थानांतील फ्रीमेसनरीचे मोठे मास्तर, ह्मणतात " हीं वापर-

त्याच्या योगानें तावडतोब गुण आला. " व्हेरी रेव्हरंड बी. फवनँड मोठ पाद्रीसाहेब ह्मणतात " हीं गुणकारक आहेत यांत शंका नाहीं. " जी. एस. रीस्टीसाहेब, एल. सी. ई., ह्मणतात " जलद लागू पडण्याच्या कामास या सारखें दुसरें औषध नाहीं." पी. जे. डेली साहेब चीफ गार्ड सदर्न मराठा रेलवे ह्मणतात " मृत्युमुखीं पडलेल्यास हीं औषधें केवळ अमृततुल्य आहेत."

बाटलीवाला यांचे तापावरील रामबाण एग्युमिक्श्चर व गोळ्या व बाटलीवाला कंपनीचें पटकीवर रामबाण कोलेरल हीं सर्व ठिकाणीं विकत मिळतील किंवा एकटेच बनविणार डॉ. एच. एल. बाटलीवाला, वरली, दादर, मुंबई, यांजकडेस मिळतील. शिशीची किंमत १ रुपाया. व्यापाऱ्यांस कमीशन मिळेल.